From the house of
HOME CABLE
HOME NET

# होम टाइम्स

मराठी

साप्ताहिक शनिवार

FREE COPY

RNI No.: MAHMAR/2016/66872 | Post Reg. No. MNE/374/2019-21 | Volume IX | Issue 25 | Saturday, 16th Sept 2023 to 22rd Sept 2023 | Price ~~Rs~~3/-

www.hometimes.in www.facebook.com/hometimes.in www.twitter.com/hometimes_news hometimes.in write2us@hometimes.in

होम टाइम्स च्या वाचकांना गणेश चतुर्थी निमित्त हार्दिक शुभेच्छा!


# कॉंक्रिटीकरण उठले झाडांच्या मुळावर

## टी वॉर्डकडून होतेय नियमांची पायमल्ली

■ होम टाइम्स टीम

मुलुंड आणि परिसरात वेगाने सुरू असलेल्या विकासकामांमुळे झाडांचे आयुष्य कमी होऊ लागले आहे. अशा कामांमुळे वृक्षतोडीच्या घटनांमध्ये वाढ होत असून त्याचा फटका मुलुंडकरांना सहन करावा लागत आहे.

पावसाळ्यात मुंबईत अनेक ठिकाणी झाडे पडण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे अनेकवेळा नागरिकांची जीवित व वित्तहानीही होते. या प्रकाराच्या वाढत्या घटना पाहून होम टाइम्सच्या टीमने समस्येच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न केला असता, अशी काही छायाचित्रे होम टाइम्सच्या कॅमेऱ्यात कैद झाली आहेत. त्यामुळे मुलुंड टी वॉर्डातील कारभार उघड झाला आहे. खरं तर, २०१८ मध्ये राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने झाडांच्या मुळांभोवती एक मीटर जागा सोडण्याचे आदेश दिले होते. मात्र, मुलुंडमधील रस्ते आणि पदपथांवर नियमांचे पालन होताना दिसत नाही. (पान ३ वर)



MUNICIPAL CORPORATION OF GREATER MUMBAI

No. DMC/DM/3618/OD Dt. 5.12.2018

Sub :- Regarding provision and making space for tree / around trees, removal of asphalt / concrete around the trunk of the road side trees in MCGM.

It is observed that while widening / resurfacing / improvement of roads, there is no space left around the trees. It result in lack of breathing space for trees ( which is very much necessary for respiration & aeration to roots in trees and for its profound growth) and it leads to barrier for growth and maintenance of the trees. In such conditions trees are not being properly grown and become weak gradually.

In this regard. Hon. National Green Tribunal has already directed to make available. 1mtr. Space area around the tree trunk for its better growth of root zone to achieve preservation and protection of trees.

This office has already issued directions to various departments for safeguarding trees vide no. DMC /DM/961 dated 08.06.2017.

However, it is absolutely necessary to follow this instruction to achieve survival of trees and for better maintenance of trees in MCGM Jurisdiction.

It is hereby requested to direct all the staff concerned to take precaution and provision to make breathing space available while widening/resurfacing/ improvement of roads or any other works. Also it is also mandatory to keep space for new plantation of trees along both sides the roads as per Maharashtra (Urban Area) Preservation and Protection of Tree Act 1975.



एम. जी. रोड, एमएसइडीसीएल ऑफीस जवळ

# गणपती बाप्पा आले रे...

## गणेशोत्सवासाठी पोलीस, पालिका प्रशासन सज्ज

■ होम टाइम्स टीम

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपल्याने शहरातील विविध कारखान्यांमध्ये बाप्पांच्या मूर्तींवर रंगाचा शेवटचा हात फिरविण्याच्या कामाने जोर धरला आहे. मूर्तींचे डोळे, दागिन्यांची सजावट सध्या वेगात सुरू असून त्यासाठी कामगार रोज १२ ते १५ तास काम करत आहेत.

कारखान्यांत ५० टक्के मूर्तींचे बुकिंग झाले असून, ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. बाजारात मूर्ती विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत. दरम्यान, कच्च्या मालाच्या किमती वाढल्याने यंदा गणेशमूर्तींच्या किमतीत ३० टक्क्यांनी वाढ झाल्याचे व्यावसायिकांकडून सांगण्यात येत आहे. मुलुंड शहरात गणेश मूर्ती बनविणारे लहान आणि मोठे सात ते आठ कारखाने आहेत. सात इंचांपासून १० फुटांपर्यंत उंचीच्या मूर्ती तयार झाल्या असून यावर्षी गणेशमूर्तींच्या किमतीत ३० टक्के वाढ झाली आहे. गणेश मंडळांना प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) च्या नियमांबाबत मोठा दिलासा मिळाला आहे. चार फुटांवरील मूर्तींसाठी पीओपीचा वापर करता येणार आहे. मात्र, चार फुटांपेक्षा कमी उंचीच्या मूर्तींसाठी शाडूची माती बंधनकारक असणार आहे. यावर्षी मूर्ती बनविण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीत वाढ झाली असून त्यामुळे गणेशमूर्तींच्या किमतीही ३० टक्क्यांनी वाढणार आहेत. प्रशासनाकडून अनेक नियमावली घालण्यात आल्या गेल्या आहेत. (पान ६ वर)




RFC
RAHUL'S
The Taste Destination
BARBEQUE ROLLS | PIZZA | PASTA
LEBANESE | CHINESE | JUICE
+91 8591692727
rahulsfoodcourtmulund
Shop no 16, Golden Willows building, Next to Mann Punjab Hotel,
Cypress, Mulund (W), Mumbai - 400080
WE SERVE JAIN FOOD

# कॉंक्रिटीकरण उठले झाडांच्या मुळावर

(पान १ वरून)



मुलुंड पूर्व चिंतामणी गार्डनजवळ




गुरू गोविंद सिंग मार्ग



हिंदुस्थान चौक



मुलुंड कॉलनी मुख्य मार्केट

मुलुंड पश्चिम गुरु गोविंदसिंग मार्गावर एकीकडे रस्त्यांवर कॉंक्रिटीकरण केले जात असतानाच, झाडांच्या मुळांवरही कॉंक्रिटीकरण करण्यात आले आहे.

यासोबतच मुलुंड कॉलनीतील मुख्य बाजारपेठेतही असेच दृश्य पाहायला मिळाले आहे.या ठिकाणी झाडांची मुळे पूर्णपणे सिमेंटने भरलेली आहेत. अशी ६ झाडे मुलुंड पश्चिम स्वप्न नगरी कृत्रिम तलावाजवळही दिसली असून या झाडांच्या मुळांजवळ केरिंग करण्यात आले आहे. इथे झाडांची मुळे मजबूत व्हायला जागा उरलेली नाही. रस्त्यालगतच्या झाडांच्या मुळांजवळ कॉंक्रीट टाकण्यात आल्याने झाडे दिवसेंदिवस कमकुवत होत आहेत. एवढेच नाही तर काही महिन्यांपूर्वी मुलुंडमधील एम.जी. रोडवरील प्रसूती ग्रहासमोरील फूटपाथवर मुंबई महापालिकेच्या टी वॉर्डकडून फूटपाथचे काम करण्यात आले आहे. या पदपथावरील काही झाडांजवळ पुरेशी जागा सोडण्यात आली आहे, मात्र अजूनही अनेक झाडे अशी आहेत की, जेथे राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने दिलेल्या एक मीटर जागेच्या आदेशाचे पालन झालेले नाही. मुलुंड पश्चिम तसेच मुलुंड पूर्व येथील परिसरातही होम टाइम्सच्या कॅमेऱ्याने असेच दृश्य टिपले आहे. मुलुंडच्या बहुचर्चित चिंतामणी देशमुख उद्यानात झाडांभोवती पुरेशी जागा सोडण्यात आली आहे. मात्र या उद्यानाला लागून असलेल्या फूटपाथवर ५० हून अधिक झाडे असून, या उद्यानात फूटपाथच्या बांधकामामुळे फूटपाथ पूर्णपणे कॉंक्रिटने भरला आहे.

मुलुंड पूर्व एन वाय सिनेमाजवळील झाडांच्या मुळांवरही सिमेंट टाकण्यात आले आहे. यासोबतच मुलुंडमध्ये अशी अनेक ठिकाणे आहेत जिथे महापालिकेने केलेल्या कामांमुळे नियमांची पायमल्ली झाली आहे. झाडांची मुळे मजबूत करण्यासाठी मातीऐवजी कॉंक्रीट टाकल्याने झाडे कमकुवत होतात आणि पावसाळ्यात ही झाडे रस्त्यावर पडून नागरिकांसाठी त्रासदायक ठरतात. एकीकडे शासन वृक्षारोपणाचा नारा देत आहे, तर दुसरीकडे महापालिकेकडूनच झाडांची निर्दयीपणे हत्या केली जात आहे. मुंबई महापालिकेने केलेल्या या कामांना पर्यावरणप्रेमींकडूनही तीव्र विरोध होत आहे. मुंबई महापालिकेच्या या निष्काळजीपणाचे परिणाम आता येत्या काळात नागरिकांना भोगावे लागतील. या कामाची जबाबदारी कोणाची आहे आणि येणाऱ्या काळात महापालिका या झाडांना मुळापासून कॉंक्रिट काढून नवसंजीवनी देणार का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.




एन. वाय. सिनेमा जवळ



स्वप्न नगरीजवळ




# सं|पा|द|की|य ▪ हेमांशू कोठारी

## टोलचा झोल आता तरी थांबवा

एखादवेळेस मुंबई कधीपासून क्राईम मुक्त होईल हे सांगणे सोपे असावे, पण ती टोल मुक्त कधी होईल हे सांगणे फारच कठीणआहे. कारण मुंबईमध्ये इंट्री करणाऱ्या पाच टोल नाक्यांचा झोल संपता संपेनासा झाला आहे. अनेकदा या टोल नाक्यांच्या विरोधात अनेक संघटना, राजकीय पक्षांनी आंदोलने केली आहेत. अनेकदा टोल नाक्यांच्या परिसरात राहणाऱ्या रहिवाशांनी देखील टोलच्या त्रासाबाबत रस्त्यावर उतरून आपला निषेध नोंदवला आहे. पण काही केल्या हे टोल नाके काही बंद होईनात. रस्त्याच्या मार्गाने मुंबई बाहेरून कोणाला मुंबईत यायचे असेल तर त्याला टोल दिल्याशिवाय मुंबईमध्ये पाय ठेवता येणार नाही. बरे टोल भरून तो मुंबईत आला असेल तर मुंबई बाहेर जातानाही टोल भरल्याशिवाय मुंबईच्या बाहेर एक पाऊलही ठेवता येणार नाही. आत येतानाही टोल आणि बाहेर जातानाही टोल द्यावा लागतो. असो, एखाद्या खासगी कंपनीने स्वत:चा पैसा खर्च करून रस्ते बांधले असतील, दुरुस्त केले असतील, रुंद केले असतील तर त्याने खर्च केलेले पैसे तिला परत मिळायलाच हवेत, यात कोणतेही दुमत नाही. पण जर या रस्त्यावरील वाहतूककोंडी कमी व्हावी, ती दूर व्हावी यासाठी सरकारच्या तिजोरीतून पैसे खर्च करून ठिकठिकाणी उड्डाण पूल बांधले असतील तर त्याची वसुली या टोल कंपन्यांनी कारवाई का? असा सवाल सामान्य टोल भरणाऱ्यांच्या मनात उभा राहतोच ना! आज मुंबईत ज्या संख्येने उड्डाण पूल बांधण्यात आले आहेत त्यात सरकारचा पैसा खर्च झाला आहे. परिणामी हा पैसा लोकांच्या खिशातून कराच्या रूपाने सरकारकडे गेला आहे. मग पूल बांधण्यासाठी सामान्य नागरिकांनी स्वत:च्या खिशात हात घालून उड्डाण पुलांची उभारणी करायची आणि मुंबईच्या हद्दीतवर वाटमारीसाठी बसलेल्या टोल कंपन्यांनी लोकांकडून टोल का वसूल करायचा? बरं कधी काळी बांधलेल्या रस्त्याच्या बदल्यात टोल घ्यायचा असेलही, पण मग त्यात वाढ का करायची? असे सवाल लोकांच्या मनात उभे राहत आहेत. कारण मुंबईच्या हद्दीवर वसुलीचे दुकान मांडून बसलेल्या पाचही ठिकाणच्या टोल कंपन्यांनी येत्या १ ऑक्टोबर पासून दर वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. पण ही वाढ केवळ यंदाच होईल असे नव्हे, कारण प्रत्येक पाच वर्षांनी टोल कंपन्यांनी अशी वाढ करून लोकांच्या खिशात हात घातला आहे. मुंबईत सध्या पाच ठिकाणी टोल नाके अस्तित्वात आहेत. त्यामध्ये ऐरोली, वाशी, दहिसर, एलबीएस मार्ग आणि मुलुंड पूर्वद्रुतगती महामार्ग यांचा समावेश आहे. सरकारने यासाठी त्या कंपन्यांना २५ वर्षांची परवानगी दिली आहे. त्यामुळे अजूनही काही वर्षे ही वसुली होणार आहे. पण त्यानंतर तरी लोकांची या पाचही टोल नाक्यांपासून मुक्ती मिळेल की नाही याबाबत लोकांच्या मनात संशय आहे. कारण आज या पाचही महामार्गांची स्थिती पाहता ती अजिबात चांगली नाही. रस्त्यांची दयनीय अवस्था असतानाही या कंपन्या पैसे वसूल करत आहेत. मग यांच्या वसुलीचा कार्यकाळ संपल्यावर दुसऱ्या कंपन्या तिथे ठाण मांडून नव्या दराने वसुली करायला का बसणार नाहीत? कारण आज या रस्त्यांची अवस्था पाहता त्यांची पुन्हा नव्याने दुरुस्ती होणे गरजेचे आहे. कारण ज्या कंपन्यांनी हे रस्ते बांधलेत त्या रस्त्यांची गॅरेंटी कधीच संपलीय तर काहींची संपायला आली असेल. मग पुन्हा नव्याने रस्ते बांधायला लागणार, पुन्हा वसुलीला सरकार परवानगी देणार असे किती वर्षे चालणार? बरं मुंबईत राहणाऱ्या रहिवाशांनाही टोल मुक्ती नाहीच. त्यांच्यात मुंबईत त्यांनी पैसे देऊन रस्त्यांचा वापर करायचा? हे कृत्य चीड आणणारे नाही का? आज मुंबईत निर्माण झालेल्या जागेच्या कमतरतेमुळे अनेक सामान्य नागरिकांनी मुंबईच्या बाहेर वसलेल्या शहरांचा आधार घेतला आहे. मात्र नोकरीसाठी त्यांना रोज मुंबईत यावे आणि जावे लागते. त्यामुळे त्याचे पूर्ण आयुष्य येता जाता टोल भारण्यासाठीच चाललेय. त्याच्या कमाईचा काही भाग टोल कंपन्यांच्या घशात जातोय. याची त्याला चीड आहे. त्यामुळे मुंबईकरांची वाटमारी करणारी ही लूट थांबायलाच हवीय. रस्त्यांवर पडलेले खड्डेही त्याच्याच पैशातून बुजवायचे, रस्त्यांवर उड्डाण पूलही त्याच्याच पैशातून बांधायचे आणि वसुलीही त्याचीच करायची, हे कसे चालू द्यायचे? यावर गांभीर्याने विचार व्हायलाच हवाय. सरकारने केला नाही तर लोक करतील आणि लोकांनी केलेला विचार वाटमारी करणारी व्यवस्था उधळून लावणारी असेल.

# श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी मंदिरांमध्ये लोटली भाविकांची अलोट गर्दी




## मुलुंड झाले होते श्रावणमय


▪ **होम टाइम्स टीम**

२०२३ मधील श्रावण महिन्याचा शेवटचा सोमवार असल्याने शिवमंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी दिसून आली. या वेळी मंदिर प्रशासनातर्फे इतरही अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण मंदिरांमध्ये दिव्यांची आरासही करण्यात आली होती.

भगवान शंकरासाठी श्रावण महिना विशेष मानला जातो. या महिन्यात सोमवारी भगवान शंकराची पूजा केल्याने भगवान शिव भक्तांवर प्रसन्न राहतात. असा भाविकांचा समज आहे. यंदा श्रावणाचे आठ सोमवार होते. ११ सप्टेंबर हा श्रावण महिन्याचा शेवटचा सोमवार असल्याने मंदिरांमध्ये विशेष व्यवस्था करण्यात आली होती.

अनेक मंदिरांमध्ये दिवे लावून भगवान शंकराची पूजा करण्यात आली आणि अनेक मंदिरांमध्ये विविध प्रकारची सजावट आणि रोषणाई करण्यात आली. मुलुंड येथील बाल राजेश्वर मंदिरातही माता की चौकी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थिती नोंदवली होती. त्यामुळे संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता.





# फ्लोअरिंग सोल्युशन्स

## गणपती डेकोरेशन

## होलसेल दरात उपलब्ध






आम्ही उच्च दर्जाचे ताडपत्री आणि शेड नेट तयार करतो. आमची डोरमॅट, कुशन मॅट आणि एस-मॅटची एजन्सी आहे. घरे आणि कार्यालयांसाठी, आम्ही कृत्रिम ग्रास, न विणलेले कार्पेट आणि पीव्हीसी कार्पेट देखील विकतो.






सणासुदीच्या वेळी कृत्रिम फुलांची कमान आणि ग्रीन मॅटचा बॅकड्रॉप सुध्दा उपलब्ध करून देतो. सर्व उत्पादने घाऊक दरात उपलब्ध आहेत.

पत्ता : बी-१४ सुनीता आनंद पॅलेस, बाल राजेश्वर रोड, वैशाली नगर, मुलुंड (पश्चिम), मुंबई

संपर्क : योगेश मजिठिया : 9819243679 / करण मजिठिया : 7977009021

# श्री कच्छी लोहाणा महाजन मुलुंड आणि लायन लेडी ऑक्झलरी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन

■ होम टाइम्स टीम

**श्री कच्छी लोहाणा महाजन मुलुंड आणि लायन लेडी ऑक्झलरी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**




श्री कच्छी लोहाणा महाजन मुलुंड आणि लायन लेडी ऑक्झिलरी यांच्या वतीने बुधवारी मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात अनेक नागरिकांनी कॅन्सरची तपासणी केली. यासोबतच रक्तदाब, मधुमेह व इतर तपासण्याही येथे ठेवण्यात आल्या होत्या. यावेळी लायन लेडी ऑक्झिलरीच्या डिस्ट्रिक्ट चेअर पर्सन नेत्रा बलमवार यांची प्रमुख उपस्थिती होती. मुलुंड पश्चिम कच्छी लोहाणा महाजन वाडीच्या पवनी बँक्वेट हॉल येथे बुधवारी दुपारी १:०० ते ४:०० या वेळेत या तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ८० हून अधिक नागरिकांची कॅन्सरची तपासणी करण्यात आली. लायन्स क्लबच्या सेवा सप्ताहादरम्यान या सर्व नागरिकांना त्यांचे रिपोर्ट देण्यात येणार आहेत. पॉझिटिव्ह रिपोर्ट आढळलेल्या रुग्णांवर एनएम रुग्णालयात मोफत उपचारही केले जाणार आहेत. यावेळी डिस्ट्रिक्ट चेअरपर्सन लायन देवरतन डागा, झोन चेअर पर्सन लायन मयूर लाखानी, लायन्स क्लब ऑफ मुलुंडचे प्रेसिडेंट लायन शंकर पद्मशाली, श्री कच्छी लोहाणा महाजन वाडीच्या मॅनेजिंग ट्रस्टी माया कोठारी, महेश ठक्कर आणि लायन लेडीच्या प्रेसिडेंट सुषमा ठक्कर, यांच्यासह महाजनवाडीतील सदस्य आणि इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी लायन लेडी ऑक्झिलरीच्या डिस्ट्रिक्ट चेअर पर्सन नेत्रा बलमवार यांनी लायन्स क्लब ऑफ मुलुंडचे कौतुक केले आणि आगामी काळातही असेच महत्त्वाचे प्रकल्प हाती घेतले जातील अशी अपेक्षा व्यक्त केली.














# गणपती बाप्पा आले रे...

(पान १ वरून)

मूर्तिकरांसाठी जागेची व्यवस्था केली जाण्याची घोषणा देखील करण्यात आली होती. परंतु प्रशासनाकडून योग्य ते सहकार्य मिळत नसल्याने ही केवळ घोषणाच ठरली अशी खंत मुर्तीकारांनी व्यक्त केली आहे. चार फुटांच्या वरती पीओपीच्या मूर्ती बनविण्यास परवानगी दिलेली असली तरी देखील अनेक घरगुती गणपती मूर्ती सुध्दा पिओपी मातीची खरेदी केली जात आहे. शाडू मातीची मूर्ती तुटण्याची शक्यता जास्त असते तसेच या मुर्त्यांची किंमत सुध्दा पीओपीच्या मूर्तींच्या तुलनेने जास्त असते, म्हणूनच नागरिकांकडून पीओपीच्या मुर्त्यांची जास्त खरेदी केली जात असल्याचे मूर्तिकारांचे म्हणणे आहे. त्यामुळे यंदा मूर्तिकारांनी दीड फुटांपासून ते तीन फुटांपर्यंतच्या पीओपीच्या मुर्त्या देखील विक्रीसाठी ठेवल्या आहेत. पीओपीच्या इतर वस्तू घरांमध्ये वापरल्या जातात, त्यांचा वापर सर्रासपणे केला जातो, मग गणेश मुर्त्यांच्या बाबतीत सरकारची अशी भूमिका का? असा सवाल देखील मूर्तिकारांकडून उपस्थित केला जात आहे.

# गणेशोत्सवासाठी शासन, प्रशासन सज्ज







■ **होम टाइम्स टीम**

गणेश चतुर्थीच्या काळात गणेश विसर्जनासाठी पालिका प्रशासनाकडून जय्यत तयारीला सुरुवात झालेली आहे. मुलुंडमध्ये पूर्व आणि पश्चिम विभागात विसर्जन केंद्र तयार करणे, परिसरात गर्दीचे नियोजन करणे आणि विसर्जन स्थानापर्यंत भाविकांना सुरक्षितपणे येता जाता येणे अशा सर्व गोष्टींसाठी पालिका आणि पोलीस प्रशासनाकडून विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

गणेश उत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. भाविकांकडून

## टी-वॉर्डचीही जय्यत तयारी सुरू

विविध साहित्यांची खरेदी सुरू झाली आहे. बाजारपेठा सजल्या आहेत. तर दुसरीकडे शासन - प्रशासन सुध्दा तयारीला लागले आहे. पालिका प्रशासनाकडून गणेश विसर्जनासाठी कृत्रिम तलाव तयार करणे, विसर्जन घाटाची डागडुजी करणे, रस्त्यावरील खड्डे बुजवणे आदी कामे सुरू झाली आहेत. मुलुंडमध्ये यावर्षी चार कृत्रिम तलाव आणि तीन नैसर्गिक तलाव असे एकूण सात गणेश विसर्जन घाट तयार करण्यात आले आहे. साईप्रस्थ परिसरातील कृत्रिम तलाव, सुरेश बारकू पाटील उद्यानातील कृत्रिम तलाव, वीर सावरकर उद्यान पूर्व येथील कृत्रिम तलाव, प्रियदर्शनी क्रीडा संकुल येथील कृत्रिम तलाव तयार करण्यात आले आहेत. यासोबतच मुलुंड पूर्वेकडे मोरया तलाव, मिठागर तलाव, हरी ओम नगर, भोईर नगर परिसरातील तलाव देखील गणेश विसर्जनासाठी तयार करण्यात आले आहेत. पालिका प्रशासनाकडून या सर्व ठिकाणची तयारी सुरू करण्यात आली आहे. प्रत्येक तलावाच्या ठिकाणी गर्दीचे नियोजन करण्यासाठी स्वयंसेवक नेमण्यात येणार आहेत, तसेच गणेश विसर्जन निर्विघ्न व्हावे यासाठी जीव रक्षक नेमण्यात आले आहेत. या जीव रक्षकांकडून गणेश मूर्तींचे विसर्जन केले जाणार आहे. गणेश मूर्ती संकलनासाठी मात्र अद्यापि कुठल्याही प्रकारचे नियोजन करण्यात आलेले नाही. गणेश उत्सवासाठी मुलुंड परिसरात येणाऱ्या नागरिकांना कुठलीही गैरसोय होणार नाही यासाठी विसर्जन स्थळांच्या परिसरात घरगुती गणेश मुर्त्यांसाठी वेगळी व्यवस्था करण्यात आली आहे. सार्वजनिक गणेश मुर्त्यांचे विसर्जन करण्यात आला आहे. या तराफ्यात ठेऊन गणेश मूर्ती पाण्यात घेऊन जाणे सुरक्षित आणि सोयीचे असणार आहे.

मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी तसेच मुंबई पोलिसांची टीम प्रत्येक विसर्जन स्थळावर उपस्थित असणार आहे.

# ऐरोली ब्रिज बनतोय डेंजर झोन

## पुन्हा एका दुचाकीस्वाराने गमावला प्राण

■ **होम टाइम्स टीम**

मुलुंडकडे येणारा ऐरोली ब्रिज सध्या मृत्यूचा सापळा बनतो आहे. हे ठिकाण अपघातांना निमंत्रण देणारे ठरत आहे. येथे अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. एका अज्ञात वाहनाच्या धडकेत येथे आणखी एका दुचाकी स्वाराचा मृत्यू झाला आहे.

मुलुंडमध्ये राहणारा अवनेंद्र विश्वकर्मा कामानिमित्त ऐरोलीच्या दिशेने गेला होता. ऐरोली वरून तो रात्री १०:००च्या सुमारास ऐरोली खाडी येथील पोल क्रमांक ११४ जवळ आला असता त्याला पाठीमागून येणाऱ्या अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. धडकेमुळे त्याचा दुचाकीवरील ताबा सुटल्यामुळे तो खाली कोसळला आणि काही अंतरापर्यंत फरफटत गेला. त्यात त्याच्या पोटाला आणि डोक्याला जबर दुखापत झाली. जमलेल्या लोकांनी त्याच्या मोबाईलवरून ही माहिती त्याच्या नातेवाईकांना दिली आणि त्याला ऐरोली येथील इंदिरा रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र दुर्दैवाने उपचार सुरू असताना त्याचा दुसऱ्या दिवशी मृत्यू झाला. अवनेंद्र याच्या भावाने यासंदर्भात नवघर पोलीस ठाण्यामध्ये हिट अँड रनची तक्रार दिली. त्यानंतर पोलीस आता अज्ञात व्यक्तीचा शोध घेत आहेत. दरम्यान दोन आठवड्यांपूर्वी अशाच प्रकारे एका रिक्षा चालकाने दुचाकी स्वराला धडक दिल्यामुळे दुचाकी स्वराचा मृत्यू झाल्याची घटना याच परिसरात घडली होती. त्यामुळे ऐरोली खाडी परिसर एक्सीडेंट पॉईंट बनत चालला असल्याचे दिसते आहे.

# मुंबईभर नियुक्त करणार एक लाख गणसेवक

## गणेशोत्सवाच्या सुरक्षेचा भार गणसेवकांच्या खांद्यावर

■ **होम टाइम्स टीम**

मुंबईतील विघ्नहर्ता उत्सवादरम्यान मुंबईत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आता मुंबई पोलिसांसह गणसेवकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. संपूर्ण मुंबईत एक लाखाहून अधिक गणसेवक तैनात केले जाणार आहेत.

एकीकडे मुंबईतील सर्वात मोठा सण मानल्या जाणाऱ्या गणपती बाप्पांच्या महापर्वाची जोरदार तयारी सुरू आहे, तर दुसरीकडे या उत्सवासाठी प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. या महोत्सवादरम्यान मुंबईत एक लाखाहून अधिक गणसेवकांची नियुक्ती होणार आहे. मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांनी गणेश उत्सव समन्वय समितीच्या बैठकीत हा निर्णय घेतला आहे. लहान गणेश उत्सव मंडळात १० आणि मोठ्या गणेश उत्सव मंडळात २० असे एकूण एक लाख गणेशसेवक नियुक्त केले जाणार आहेत.

हे गणसेवक मुंबई पोलिसांना मदत करतील आणि शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठीही मदत करतील. एवढेच नव्हे तर मंडपाच्या आजूबाजूला कोणतेही संशयास्पद वाहन किंवा अन्य कोणतीही संशयास्पद वस्तू दिसल्यास हे गणसेवक तात्काळ पोलिसांशी संपर्क साधतील जेणेकरून अपघात वेळीच टाळता येतील.

# अतिरिक्त पोलीस आयुक्तांनी घेतली ईशान्य मुंबईतील ८०८ मंडळांची बैठक

## मंडळांना येणाऱ्या अडचणी करणार दूर



■ होम टाइम्स टीम

गणेशोत्सवापूर्वी सोमवारी मुलुंड येथील कालिदास नाट्यमंदिरात परिमंडळ ७ च्या वतीने ८०८ सार्वजनिक गणेश मंडपाच्या अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत मंडळांच्या समस्या ऐकून घेण्यात आल्या व उत्सवापूर्वी त्या सोडविण्याचे आश्वासन देण्यात आले.

गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी भाविकांमध्ये उत्साह पाहायला मिळत आहे, त्या पार्श्वभूमीवर सोमवारी (११ सप्टेंबर) मुलुंड येथील कालिदास नाट्यमंदिरात सार्वजनिक गणेश मंडळे आणि आयोजकांसाठी महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत ईशान्य मुंबईतील ८०८ सार्वजनिक गणेश मंडळाच्या अधिकाऱ्यांसह संबंधित प्रभागाचे अधिकारी, अग्निशमन दल, महावितरण, अदानी ग्रुप, तसेच वाहतूक विभागाचे अधिकारी तसेच मुंबईचे अतिरिक्त पोलिस आयुक्त विनायक देशमुख उपस्थित होते. दुपारी ४ वाजता सुरू झालेल्या या बैठकीत सर्वप्रथम गतवर्षी गणेश उत्सवात सामाजिक कार्य करणाऱ्या ५ गटांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर १० दिवस चालणाऱ्या या उत्सवात मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मंडप उभारणीपासून ते बाप्पाच्या आगमनापासून बाप्पाच्या विसर्जनापर्यंत येणाऱ्याअडचणींचे कथन केले. उपस्थित अधिकाऱ्यांनी त्या अडचणी ऐकून घेतल्या व त्या सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडून उपाययोजना आखण्यात आल्या. लवकरात लवकर आश्वासनही देण्यात आले. यामध्ये रस्त्यांवरील खड्ड्यांपासून डोक्यावर लोंबकळणाऱ्या तारा आदी समस्यांचा समावेश होता. या बैठकीत सर्व विभागांना कायदा व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन करण्यात आले. मुलुंडमधील कायदा नई सुव्यस्थेला बाधा येईल असे कोणतेही कृत्य न करण्याची ताकीद देण्यात आली. अतिरिक्त पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली व परिमंडळ ७ चे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या नेतृत्वाखाली ही बैठक पार पडली.

# सरकारने गरिबांचा गणेशोत्सव केला गोड

## शिधावाटप दुकानांमधून आनंदाच्या शिधाचे वाटप सुरू



■ होम टाइम्स टीम

राज्य सरकारकडून गरिबांना आनंदाची शिधा वाटप करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने सरकारने हे पाऊल उचलले आहे. मुलुंडमध्ये गुरुवार पासून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी शिधावाटप अधिकारी आणि मुलुंडचे आमदार मिहिर कोटेचा यांच्या हस्ते आनंदाच्या शिधाचे वाटप झाले. सर्व शिधावाटप दुकानांमध्ये हे काम सुरू झाले आहे.

एकीकडे राज्य सरकारचे विविध उपक्रम, योजना लोकांपर्यंत पोहचाव्यात यासाठी शासन आपल्या दारी हा उपक्रम राज्यभरात सुरू आहे. हा उपक्रम सुरू असतानाच आता राज्य सरकारने सणासुदीत गरिबांच्या पोटाचाही प्रश्न सोडविला आहे. गरीबांचे सर्व सण गोड व्हावेत यासाठी सरकारने सर्व शिधावाटप दुकानांमध्ये आनंदाच्या शिधाचे वाटप करायला सुरुवात केली आहे. सणासुदीच्या काळात गरिबांनाही सण साजरा करता यावा, त्यांच्याही घरात गोडधोड पदार्थ शिजवले जावेत यासाठी फडणवीस - शिंदे सरकार हे सत्तेत आल्यानंतर त्यांनी या काळात साखर, रवा, तेल, डाळ आदी वस्तूंचे वाटप सुरू करण्याचा निर्णय घेतला. दिवाळी असो वा गणेशोत्सव या काळामध्ये सरकारकडून शंभर रुपयांत आनंदाचा शिधा दिला जातो. या शिधामध्ये एक किलो रवा, एक किलो साखर, एक किलो डाळ आणि एक लिटर तेल या साहित्यांचा समावेश असतो. मुलुंडमध्ये गुरुवार सर्व शिधावाटप केंद्रांपर्यंत हा शिधा पोचविण्यात आला होता. त्यानंतर त्याच दिवसापासून या शिधाचे वाटप सुरू करण्यात आले. मुलुंड मधील ३६००० लाभार्थींना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. सर्व स्टॉक शिधावाटप केंद्रांपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे जे जे नागरिक या शिधासाठी पात्र आहेत त्यांनी त्यांच्या अधिकृत शिधावाटप केंद्रामध्ये जाऊन हा शिधा १०० रुपयांमध्ये घ्यावा असे आवाहन आमदार मिहिर कोटेचा यांनी केले आहे.

# मुलुंडच्या मंडपांमध्ये सुरु झाले बाप्पाच्या आगमनाचे स्वागत



■ होम टाइम्स टीम

**मुलुंडसह मुंबई आणि राज्यभरात बाप्पाच्या आगमनाचे जल्लोषात स्वागत होत आहे. सगळीकडे याची जोरात तयारी सुरु आहे. काही ठिकाणी ढोलताशांच्या तालावर नाचत, गाजत, ताशांच्या गजरात गणपती मूर्तीचे मंडपात आगमन केले आहे.**

१९ सप्टेंबर रोजी देशभरात गणेश चतुर्थीचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. मात्र त्यापूर्वीच विविध मंडपांमध्ये विघ्नहर्ताचे आगमन होण्यास सुरुवात झाली आहे. मुंबईतील प्रसिद्ध मंडपांमध्ये गणपती बाप्पाचे जल्लोषात स्वागत होत असतानाच दुसरीकडे मुलुंडमध्येही गेल्या दोन आठवड्यांपासून अनेक प्रसिद्ध मंडळांच्या गणेश मूर्तीचे आगमन सुरू झाले आहे. बाप्पाच्या आगमनाबाबत भाविक व नागरिकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. ढोल-ताशांसह बाप्पाचे आगमन होत आहे. यावेळी फटाकेही फोडले जात असून भाविक नाचताना दिसत आहेत. सुटीच्या दिवशी बाप्पाच्या आगमनासाठी मुलुंडच्या रस्त्यांवर नागरिकांची गर्दी पाहायला मिळते. मात्र, विघ्नहर्ता आगमनामुळे आणि कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने मुलुंडसह संपूर्ण मुंबईतही पोलिसांचा चोख बंदोबस्त आहे.

# अबब... केशवपाड्यात दोन वर्षांपूर्वी बांधलेला फुटपाथ खचला

## चार दुचाक्या गेल्या खड्ड्यात

■ होम टाइम्स टीम

केशव पाडा रोड परिसरात मुंबई महानगरपालिकेचा भोंगळ कारभार समोर आला आहे. येथे असलेला फुटपाथ रात्रीच्या वेळी अचानकपणे कोसळला. तो फुटपाथ ड्रेनेज लाईन र बांधण्यात आला होता. या घटनेमुळे तेथे उभ्या असलेल्या वाहनांचे नुकसान झाले. पुढे अशी अनुचित घटना घडवू नये म्हणून नागरिकांनी तातडीने पालिका प्रशासनाने क्शन मोडवर आले पाहिजे अशी मागणी केली आहे

केशव पाडा रोड परिसरात असलेल्या वैष्णवी सोसायटी समोरील फुटपाथ शुक्रवारी रात्री अचानक खचला. यामध्ये चार दुचाकी गाड्या खाली गेल्या. त्यामुळे त्यांचे नुकसान झाले. फुटपाथच्या खाली ड्रेनेजची लाईन आहे. त्यावर हा फुटपाथ बांधण्यात आला होता. सुदैवाने ही घटना घडण्याची वेळ रात्रीची असल्यामुळे या ठिकाणी फारशी वर्दळ नव्हती. ही दुर्घटना



घडली त्यावेळेस स्थानिकांनी तातडीने पालिका प्रशासन तसेच अग्निशमन दलाला याची माहिती दिली. घटनास्थळी माजी नगरसेविका समिता कांबळे तसेच ईशान्य मुंबई काँग्रेसचे कार्याध्यक्ष उत्तम गीते दाखल झाले. परिसरात असलेल्या नागरिकांनी देखील गर्दी केली. दोन वर्षांपूर्वी बांधलेल्या या फुटपाथची ही अशी अवस्था झालेली पाहून संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याची मागणी उत्तम गीते यांनी केली आहे. तर समिता कांबळे यांच्या निधीतून हा फुटपाथ दोन वर्षांपूर्वी बांधलेला असून त्या फुटपाथची जी अवस्था आहे ती उंदरांमुळे झाली आहे. परंतु यात जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल असे सांगितले. ज्या ठिकाणी ही घटना घडली आहे त्या वैष्णवी धाम या इमारतीमध्ये दोन दिवसानंतर गणपती बाप्पांचे आगमन होणार आहे. त्यामुळे त्या आधीच बिल्डिंगच्या गेट समोरीलच फुटपाथ अशा प्रकारे खचल्यामुळे नागरिक संतप्त झाले आहेत. या संदर्भात आता पालिका प्रशासनाकडून तात्पुरती उपाययोजना म्हणून यावर लोखंडी प्लेट टाकली जाणार असल्याची माहिती समिता कांबळे यांनी दिली.

Helpline

सिटीजन रिपोर्टर
78956 78956

होम केबल
022 - 6614 6060

होम नेट
022 - 6621 1333
customerservice@homenet.net

होम टाइम्स
022 - 6614 6050
write2us@hometimes.in

होम टाइम्स आणि होम केबलवर जाहिरात द्या
78957 78957
homecableads@gmail.com

योग्य माहितीसाठी कृपया संबंधित नंबरांवरच संपर्क करा



## जाहिरातींबाबत महत्त्वाची सूचना

साप्ताहिक होम टाइम्समधून जाहिरातदारांच्या विविध प्रकारच्या जाहिराती प्रकाशित केल्या जातात. या जाहिरातीतील मजकुराबाबत सर्वस्वी जबाबदारी जाहिरातदारांची असून त्याबाबत उद्‌भवणाऱ्या कायदेशीर वा अन्य प्रकरणात साप्ताहिक होम टाइम्सचे व्यवस्थापन, मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक यांच्यासह कोणीही जबाबदार असणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

– मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक




आरोग्य आशा

डॉ. मोनिषा रावत

# 'सुजोक'

## ल्युपस...

**औषधाशिवाय आणि कोणत्याही दुष्परिणामांशिवाय उपचार**

वेळेवर उपचार न केल्यास, हृदयविकाराचा झटका किंवा स्ट्रोक सारख्या गंभीर/जोखमीच्या समस्या उद्भवू शकतात.



*हा एक जटिल स्वयंप्रतिकार रोग आहे, ज्यामध्ये शरीराची रोगप्रतिकारक यंत्रणा विविध अवयव आणि ऊतींवर हल्ला करते, ज्यामुळे शरीरात व्यापक सूज येते. ही सूज हृदय, त्वचा, मेंदू, मूत्रपिंड, फुफ्फुस आणि रक्त पेशींवर परिणाम करते. त्यावर उपचार न केल्यास अवयवांचे नुकसान, मेंदूचा झटका, हृदयविकाराचा झटका आणि किडनीचे आजार यासारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. हा रोग पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये अधिक सामान्य आहे.*

### सामान्य लक्षणे :–

- सांध्यांमध्ये वेदना, कडकपणा आणि सूज
- जास्त थकवा
- ताप
- केस गळणे
- डोकेदुखी
- निद्रानाश
- त्वचेवर पुरळ उठणे
- तोंडाचे व्रण
- वजन कमी होणे किंवा वाढणे
- नैराश्य/अतिरिक्त चिंता
- स्मरणशक्ती कमी होणे
- कोरडे डोळे
- श्वास घेण्यास त्रास होणे

### धोके :–

- कौटुंबिक इतिहास
- अस्वास्थ्यकर आहार
- ताण
- तीव्र संसर्ग
- स्त्री असणे



*आमच्या 'मोनिषाज मंत्रा' मध्ये आम्ही लोकांना त्यांच्या ल्युपसची लक्षणांना मॅनेज करण्यासाठी मदत करतो. त्यांच्या सूज आणि आरामासाठी खालील पद्धतीने मदत करतो. तेही कोणत्याही औषधांशिवाय आणि नैसर्गिक पद्धतींनी, कोणतेही दुष्परिणाम न करता.*

- प्रक्रिया केलेले, पॅकेज केलेले, तळलेले पदार्थ, अतिरिक्त मीठ, शुद्ध साखर, ग्लूटेन, अल्कोहोल, कॅफीन, निकोटीन यांसारख्यासूज निर्माण करणाऱ्या पदार्थांचे सेवन कमी करणे.
- हळद, आले, तुळस, हिरवा चहा, हर्बल टी, हिरव्या पालेभाज्या, नट, चिया बिया इत्यादी सारख्या सूज–विरोधी पदार्थांचे सेवन करणे.
- स्मित ध्यान आणि योग–प्राणायामद्वारे तणाव दूर करणे.
- दिवसभरात किमान १०–१२ ग्लास पाणी पिऊन शरीर हायड्रेट ठेवा.

## सुजोक थेरपी




- **अॅक्युप्रेशर–** हाताच्या सर्व १० बोटांवर हलक्या दाबाने सुजोक रिंग फिरवा. दिवसातून २–३ वेळा, २५–३० वेळा फिरवा. (चित्र १ प्रमाणे)
- **बियाणे थेरपी –** सूज कमी करण्यासाठी, मेथीच्या दाण्यांची पेस्ट रोज रात्री कोणत्याही एका पायाच्या अंगठ्यावर चिकटवून लावा (चित्र २ प्रमाणे)




**आंतरराष्ट्रीय सुजोक असोसिएशन (ISA) प्रमाणित कार्यशाळेचे वेळापत्रक : १. ऑनलाइन (आंतरराष्ट्रीय) – सुजोक** -Basic (Level-I) **१८ ते २६/९/२०२३, २. ऑनलाइन–सुजोक** Six Ki-1 (Level-III) **११ ते २३/१०/२०२३, ३. निवासी, मेरिडियन सुजोक** Ki (Level-II) **२७ ते २९/१०/२०२३** •Limited Seats Registration on First Cum First Basis.


**Dr.Monisha Rawat - Founder of 'Monisha's Mantra', Mumbai and Global We Care Foundation -**
M.Sc., M.D. (Alternative Medicine), Life Coach, Master in Sujok, Consulting Nutritionist, Corporate Trainer, Holistic Counselor, Sujok Diabetes Specialist, International Lecturer for Sujok & Smile Taiji. ISA Authorized Lecturer for SUJOK Level - I, II, III & IV Award Winner as a BEST PERFORMING TEACHER by International Sujok Association (ISA) – SIC 2019 • National Excellence Health Award - 2019 During COVID-19 • Award winner of International Women Excellence Empowerment Award (WEE) – 2020 as a RISING STAR • Award winner of India Best Therapist Award for the Year 2021 by MKSS • Award Winner of ET CHANGE MAKER-2022 for Health & Wellness powered by Economic Times-Ascent & Navbharat Times
Award winner of PILLAR OF MAHARSHTRA AWARD-2022, in Association with MahaSEWA.
**An ISO Certified Centre at Mumbai Mulund- +91 8655139777/ 9029960086, Goregaon - +91 8433947592 / 9820343592**




सुनिता देसाई

# आरोग्य आणि मनोरंजन

## टॅरो कार्ड वाचन भविष्य आणि सल्ला


**१६ सप्टेंबर २०२३ ते २२ सप्टेंबर २०२३**

*सुनिता देसाई २००३ पासून टॅरो रिडींग करतात. ग्रँड मास्टर इन रेकी, फोर लेव्हल्स इन चक्रा मेडिटेशन, मास्टर्स इन मरमा, जीपी इन शियात्सू, क्रिस्टल अँन्ड पिरॅमिड एक्स्पर्टस, मास्टर्स इन अॅक्युप्रेशरीस्ट, अरोमा थेरपिस्ट, प्रानीक हिलर, औरा हिलर आणि व्हर्च्यू पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटवर दोन पुस्तके लिहिली आहेत. जे गुजराती माध्यमिक शाळेत शिकवले जाते.*



**संपर्क** : ९३२३४३०३५५ e-mail : desaisunita02@gmail.com





**■ मेष** (अ, ल, इ)
परिस्थिती सुधारेल आणि तुम्हाला समाधान वाटेल. **सल्ला :** उच्च साध्य करण्यासाठी उच्च विचार करा. जांभळ्या रंगाच्या वस्तू वापरा. तुमच्या गरजांकडे लक्ष द्या.




**■ कर्क** (ड, च, ह)
या आठवड्यात तुमच्यासाठी काही प्रवास आहे. उद्देशाने प्रवास कराल. **सल्ला :** एखाद्या पवित्र ठिकाणी किंवा मंदिराला भेट द्या. लाल रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या शक्तीकडे लक्ष द्या.



**■ तुळ** (र, ट)
तुमचे समाधान मन:शांती देईल आणि तुम्ही चांगले काम कराल. **सल्ला :** तुमचे सामान तुमच्या प्रिय आणि जवळच्या लोकांसोबत शेअर करा. वाचन तुम्हाला मदत करेल म्हणून तुम्ही जे वाचता ते वाचून समजून घ्या. तुमच्या नफ्याकडे लक्ष द्या.




**■ मकर** (ख, ज)
काही अनियोजित काम विलक्षण परिणाम देईल. स्थिरता तुमच्या वाटेवर आहे. **सल्ला :** गट तुमच्यासाठी कोणत्याही व्यक्तीपेक्षा मोठा आहे. कोणत्याही बाबतीत भागीदारी करू नका. तुमच्या वित्ताकडे लक्ष द्या.




**■ वृषभ** (ब, व, य)
पैशाची चढ-उतार असतात आणि जेव्हा तुम्हाला पैसे हवे असतात तेव्हा तुम्हाला ते मिळणार नाही. **सल्ला :** काही ठरवण्यापूर्वी दोनदा विचार करा. केशरी रंगाच्या वस्तू वापरा. तुमच्या समाधानाकडे लक्ष द्या.



**■ सिंह** (म, ट)
आपण कोणत्याही गोष्टीवर किंवा कोणावरही आनंदी होणार नाही. तुम्हाला बांधील वाटेल. **सल्ला :** । पवित्र ठिकाणी किंवा मंदिराला भेट द्या.पक्षी किंवा प्राण्यांना खाऊ घालणे तुम्हाला मदत करेल. तुमच्या नवीन कल्पनांकडे लक्ष द्या.




**■ वृश्चिक** (न, य)
तुम्हाला जे हवे आहे ते तुम्हाला मिळेल आणि काही छुपे सत्य कोणीतरी उघड करेल. **सल्ला :** लोकांचे लक्षपूर्वक आणि स्पष्टपणे ऐका.कोणावरही विश्वास ठेवू नका तुमचे काम स्वतः करा. तुमच्या जबाबदाऱ्यांकडे लक्ष द्या.




**■ कुंभ** (ग, स, श)
तुम्ही तुमचे यश साजरे कराल. तुमच्या फायद्यासाठी काही प्रसिद्ध व्यक्ती तुमच्या संपर्कात येतील. **सल्ला :** नवीन आणि जुन्या संबंधांना सहकार्य करा. कोणावरही जास्त विश्वास ठेवू नका. तुमच्या विचारांकडे लक्ष द्या.




**■ मिथुन** (क, च, ज)
तुमचे बोलणे तुमची शक्ती बनेल आणि कोणीतरी तुमची प्रशंसा करेल. **सल्ला :** जा आणि काही वृद्ध नातेवाईकांना भेटा. राखाडी रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या विश्रांतीकडे लक्ष द्या.



**■ कन्या** (प, ठ, ण)
तुम्ही भूतकाळातील चुका सुधारण्यासाठी पुरेसे मजबूत व्हाल आणि त्यामुळे तुम्हाला खूप मदत होईल. **सल्ला :** परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विश्वासू व्यक्तींचा सल्ला घ्या. तुमच्या इच्छाशक्तीकडे लक्ष द्या.



**■ धनु** (भ, ड, फ, ट)
ज्याला तुम्ही जास्त विचारात घेत नाही अशी व्यक्ती खूप मोठ्या गोष्टींमध्ये मदत करेल. काही आश्चर्ये आहेत. **सल्ला :** थोडा वेळ आध्यात्मिक वाचनाला द्या.गुंतवणुकीसाठी वेळ चांगला आहे त्यामुळे त्यावर लक्ष केंद्रित करा. भ्रमाकडे लक्ष द्या.



**■ मीन** (द, च, झ)
तुम्हाला निराशेचा सामना करावा लागेल. न सुटलेल्या समस्या तुम्हाला तुमच्या दिनचर्येत त्रास देतील. **सल्ला :** प्रतिकूल परिस्थितीकडे लक्ष देऊ नका शुभेच्छुकांसाठी काही वेषभूषा लेख ठेवा. जेवण आणि झोप याकडे लक्ष द्या.

Volume : IX | Issue : 25 होम टाइम्स

# मुंबईतील उद्याने पुन्हा खासगी हातात देण्याची महापालिकेची तयारी

## २०१६ मध्ये झाला होता धोरणाला विरोध

■ होम टाइम्स टीम

**सन २०१६ मध्ये खुल्या जागेच्या धोरणाला विरोध केल्यानंतर आता पुन्हा तेच धोरण राबवून मुंबईतील मैदाने आणि उद्याने खासगी हातात देण्याची तयारी महापालिकेने केली आहे. मात्र २०१६ नंतरही या धोरणाला नागरिकांकडून तीव्र विरोध होत असताना दिसत आहे.**

२०१६ मध्ये ओपन स्पेस धोरणाला नागरिकांनी विरोध केल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर बंदी घातली होती. त्यावेळी २१६ पैकी १९० खुल्या जागा परत घेण्यात आल्या होत्या. मात्र, २६ उद्याने आजही राजकारण्यांच्या मालकीची आहेत. पण आता पुन्हा एकदा उद्यान आणि मोकळ्या जागा तसेच मनोरंजनाच्या मैदानांसाठी दीर्घकालीन धोरण आखण्याची तयारीमुंबई महानगरपालिका करत आहे. त्याअंतर्गत मुंबईतील उद्याने आणि मोकळ्या जागा खासगी हातात देण्याची तयारी सुरू आहे. पालिकेचे म्हणणे आहे की धोरणे बनवल्यानंतर खाजगी संस्था आणि कंपन्या विकासासाठी त्यांचा अवलंब करू शकतील. आकडेवारीबद्दल बोलायचे झाले तर, मुंबईत पालिकेकडे एकूण १०६८ बागा, खुल्या जागा आणि मोकळी मैदाने आहेत. हे काम करण्यापूर्वी १० ऑक्टोबरपर्यंतमुंबई पालिकेने नागरिकांकडून सूचना आणि हरकतीही मागवण्यात आल्या आहेत. त्यासाठी नागरिक पालिका पोर्टलवर जाऊन त्यांच्या सूचना आणि हरकती पालिकेकडे पाठवू शकतात. त्यानंतर पालिका या विषयावर अंतिम निर्णय घेईल.

मुलुंडबद्दल बोलायचे झाले तर मुलुंड हे उद्यान आणि मोकळ्या मैदानांसाठी प्रसिद्ध आहे. अशा स्थितीत ही मोकळी मैदाने व उद्याने खासगी हाती देण्याचे धोरण नागरिकांकडून चुकीचे मानले जात असून नागरिकांनी या धोरणाला विरोध केला आहे. येत्या काळात या उद्यानांमध्येही बांधकामे होतील, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे त्यांच्या मुलांना खेळण्यासाठी मैदान उपलब्ध होणार नाही.



# तुळशी आणि विहार तलाव पूर्ण क्षमतेने भरले

## पाणी कपात बंद करण्यासाठी हवाय अजून आठ दिवसांचा पाऊस

■ होम टाइम्स टीम

**मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाने पुन्हा दमदार हजेरी लावली आहे. या क्षेत्रात अवघ्या २४ तासात तलावातील पाणी साठ्यात ४० हजार ५२६ दशलक्ष लिटरने वाढ झाली आहे. परिणामी सातही तलावांतील एकूण पाणीसाठा १३ लाख ४८ हजार ४४९ दशलक्ष लिटरवर पोहचल्याने मुंबईवरील पाणी संकटाची धार काहीशी कमी झाली आहे.**



मुंबईच्या तलाव क्षेत्रात गेल्या २४ तासात (मंगळवार) १०७ ते १३५ मिमी पावसाची नोंद झाली. सर्वाधिक १३५ मिमी पाऊस म ोडक सागर तलाव क्षेत्रात पडला आहे. नाशिक जिल्ह्यातील अप्पर वैतरणा तलाव क्षेत्रातही ११२ मीमी पाऊस झाला. शहराला दररोज सर्वाधिक १,८५० दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा करणाऱ्या भातसा तलावाच्या क्षेत्रातही ११९ मिमी पावसाची नोंद झाली. येणारा आठवडाभर पाऊस सक्रिय राहणार असल्याने या साठ्यात मोठी वाढ होईल, असा अंदाज आहे.

मुंबई शहराला किमान १० ते ११ दिवस पुरेल इतका पाणीसाठा २४ तासात जमा झाला आहे. ७ सप्टेंबरला तलावाच्या पाणलोट क्षेत्रात १३ लाख ७ हजार ९२३ दशलक्ष लिटर इतका पाणीसाठा होता. यात सरासरी ३ टक्क्याने वाढ झाल्यामुळे १३ लाख ४८ हजार ४४९ दशलक्ष लिटरवर पोहचला. दरम्यान तलाव भरण्यासाठी अजून ९८ ते ९९ हजार दशलक्ष लिटर पाण्याची आवश्यकता आहे. म ुलुंड भांडुप परिसरात असलेल्या तुळशी आणि विहार तलाव हे आता पूर्ण क्षमतेने भरलेले आहेत. या आठवडाभरात समाधानकारक पाऊस पडला तर मुंबईकरांवरचे पाणी कपातीचे संकट हे टळणार आहे.

# टोलचा झोल संपेना.. मुंबईत येणे होणार महाग

## १ ऑक्टोबरपासून टोलचे दर २० रुपयांनी वाढणार

■ होम टाइम्स टीम

मुंबईत ये-जा करणाऱ्या वाहनधारकांना आता १ ऑक्टोबरपासून जास्त टोल भरावा लागणार आहे. कारण प्रशासनाने टोल दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, वाढ होऊनही नागरिकांना सुविधा मिळत नसल्याने या वाढत्या किमतींचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने निषेध केला आहे.



महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (MSRDC) मुंबईच्या सीमेवर असलेल्या टोलनाक्यांबाबत मोठा निर्णय घेतला आहे. याअंतर्गत पुढील महिन्यापासून म्हणजेच १ ऑक्टोबरपासून टोल टॅक्समध्ये वाढ होणार असून, त्यामुळे वाहनचालकांना धक्का बसणार आहे. मुंबईतील पाच एंट्री पॉईंटवर टोल आकारला जातो. ज्यामध्ये ऐरोली, वाशी, दहिसर, मुलुंडमधील लाल बहादूर शास्त्री मार्ग (एलबीएस) आणि मुलुंडमधील ईस्टर्न एक्सप्रेस हायवेचा समावेश आहे. १ ऑक्टोबरपासून कारसाठी ५ रुपये, मिनी बससाठी १० रुपये आणि ट्रक आणि बससाठी २० रुपये टोल टॅक्स वाढवण्यात आला आहे.

### २००२ पासून टोल सुरू झाला

मुंबईतील पाच प्रवेशद्वारांवरील टोलवसुली २००२ मध्ये सुरू झाली आणि ही वसुली सुमारे २५ वर्षे म्हणजे २०२७ पर्यंत सुरू राहणार आहे. २००२ मध्ये, कारसाठी २० रुपये, मिनीबससाठी २५ रुपये, ट्रक/बससाठी ४५ रुपये आणि अवजड वाहनांसाठी ५५ रुपये टोल होता. सध्या टोल दर कारसाठी ४० रुपये, मिनी बससाठी ६५ रुपये, ट्रक/बससाठी १३० रुपये आहे. त्याचबरोबर या पाच एंट्री पॉइंटवर अवजड वाहनांकडून १६० रुपये टोल वसूल केला जात आहे.

### १ ऑक्टोबर २०२६ रोजी टोलच्या किमती पुन्हा वाढतील

जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेत असे लिहिले आहे की, दर तीन वर्षांनी मुंबईतील पाच प्रवेशद्वारांवर वसूल करण्यात येणाऱ्या टोलच्या दरात वाढ करण्यात येईल. १ ऑक्टोबर २०२३ पासून नवीन दर लागू झाल्यानंतर, आता १ ऑक्टोबर २०२६ पासून टोलच्या किमती पुन्हा वाढण्याची अपेक्षा आहे.

### वाहनचालकांत दिसतोय संताप

सातत्याने टोल दरात वाढ करण्याच्या निर्णयाबाबत वाहनचालकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. चालकांच्या अनेक समस्या न सोडवता केवळ टोलचे दर वाढवून त्यांच्याकडून टोल वसूल केला जात आहे. टोलपासून अवघ्या काही मीटर अंतरावर राहणाऱ्या रहिवाशांकडूनही मुंबईत प्रवास करताना टोल आकारणी केली जात आहे, तर टोल माफ व्हायला हवा, असे नागरिकांचे मत आहे. एवढेच नव्हे तर इतर सुविधांकडेही प्रशासनाकडून लक्ष दिले जात नाही. ज्यामध्ये खड्डा, शौचालय, पाणी आदी सुविधांचा समावेश आहे.

### मनसेने केली भाववाढीविरोधात निदर्शने

बुधवारी महाराष्ट्र नवनिर्माण सेवेच्या वतीने मुलुंड पूर्व इस्टर्न एक्स्प्रेस हायवेवर असलेल्या टोलनाक्यावर टोल दरवाढीबाबत आंदोलन करण्यात आले. मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी टोल प्रशासनाला पत्र पाठवून या सुविधा लवकरात लवकर सुरू कराव्यात अशी मागणी केली असून येत्या काही दिवसांत सुविधा सुरू न झाल्यास आणि त्यानंतर १ ऑक्टोबरपासून वाहनचालकांकडून नव्या दराने टोलवसुली झाल्यास मनसे कार्यकर्त्यांकडून टोल नाक्यांवर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असे संकेतही दिले आहेत.

# म्हाडा कॉलनीत आढळला अज्ञात व्यक्तीचा मृतदेह

## परिसरात उडाली खळबळ

■ होम टाइम्स टीम

मुलुंड पूर्व येथे एका ३५ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर नवघर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

नवघर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी पोलिसांना एका व्यक्तीचा फोन आला. त्याने सांगितले की, मुलुंड पूर्वेकडील म्हाडा कॉलनीत एक मृतदेह आढळला आहे. हा फोन येताच नवघर पोलिसांनी थेट घटनास्थळ गाठले. तेथे एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला आणि विच्छेदनासाठी तो घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात पाठवून दिला. या अज्ञात व्यक्तीचे वय अंदाजे ३५ वर्षे असल्याचे सांगण्यात येत आहे. या व्यक्तीच्या शरीरावर जखमेच्या कोणत्याही खुणा आढळल्या नाहीत. नवघर पोलिसांनी एडीआर अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# मुलुंड पूर्वेकडील गोदामातून झाली लाखो रुपयांची चोरी

## नवघर पोलिसांकडून तपास सुरू

**होम टाइम्स टीम**

अंधाराचा फायदा घेत मुलुंड पूर्वेकडील गव्हाण पाडा परिसरात असलेल्या गोदामात घुसून लाखो रुपयांची चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. सध्या नवघर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू केले आहे.

नवघर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी कृष्णा बाथे हे ठाणे येथील रहिवासी आहेत.ते मुलुंड पूर्व गव्हाण पाडा परिसरात असलेल्या कोणार्क रिटेलर्स कंपनीत सिव्हिल इंजिनीअर म्हणून कामकरतात. सुपरवायझर मोहित १० सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजता आर्य पार्क येथील गोडाऊनला कुलूप लावून घरी गेले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी साडेनऊ वाजता गोडाऊन उघडले असता त्यातून अनेक वस्तू गायब झाल्याचे निदर्शनास आले. गायब झालेल्या वस्तूंची अंदाजे एकूण किंमत १ लाख ६७ हजार रुपयांपेक्षा जास्त असल्याचे सांगण्यात येत आहे. या गोदामात ड्रिलिंग मशिन, ग्राइंडर मशिन आदी अनेक बांधकाम साहित्य ठेवण्यात आले होते. त्यांच्या कामगारांच्या वस्तूंची पाहणी केल्यानंतर, कोणीतरी अज्ञात व्यक्ती गोदामात घुसून या वस्तू चोरल्याचे मोहित यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी नवघर पोलीस ठाण्यात जाऊन घटनेची माहिती दिली. सध्या नवघर पोलिसांनी भादंवि कलम ३४, ३८०, ४५४ आणि ४५७ अन्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.




जसराज ॲन्टिक ®

सरोज गड़ा (मुलुंड-पूर्व) (राईधणजर/गडशीशा)



सणासाठी विशेष ऑफर

10% to 40% डिसकाउंट

१ ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांमध्ये अनेक नवीन डिझाईन्स उपलब्ध

नेत्रदीपक आणि आकर्षक डिझाईन जे मूळ दागिन्यांनाही फिके पाडेल + कुंदन + नेकलेस सेट
पेंटेड ब्युटी लाँग सेट + चंदनहार + दागिने + जवपतला गोल्ड + रोडियम ब्रेसलेट + चेन
आणि अनेक प्रकारचे आलिशान आणि आकर्षक दागिने

जुन्या आणि नवीन सर्व ग्राहकांचे स्वागत आहे

नागरिकांचा विश्वास म्हणजे जसराज ॲंटिकची खास ऑफर

सणाच्या ऑफरवर १०% ते ४०% सूट

CONTACT : GIRISH GADA - 9821376756 SAROJ GADA - 9821854370

Note: Before coming pl buzz on Cell.

# मुलुंडमधील रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

## राजस्थानहून आलेल्या प्रवेशाचे दोन लाख रुपये केले परत

■ **होम टाइम्स टीम**

रिक्षा चालकांनी मनमानी केल्याच्या बातम्या आतापर्यंत अनेकदा ऐकल्या असतील, पण मुलुंडमध्ये एका रिक्षा चालकाच्या प्रामाणिकपणाची जोरदार चर्चा सुरु आहे. या प्रामाणिक रिक्षा चालकाने एका प्रवाशाचे दोन लाख रुपयांचा किमती ऐवज परत केला आहे. राजस्थानमधून आलेले एक प्रवाशी रिक्षामध्ये हा ऐवज आणि रोख विसरले होते. जे प्रामाणिक रिक्षा चालकाने शोध घेऊन परत केले. या प्रामाणिक रिक्षा चालकाचे नाव सतीश आपटे असे आहे.

रिक्षा चालक सतीश आपटे मुलुंडमध्ये रिक्षा चालवत असतात नेहमीप्रमाणे त्यांनी सर्वोदय नगर जैन मंदिर येथून गुरुवारी दुपारी एक भाडे घेतले. या प्रवाशास त्यांनी मुलुंड पूर्वेकडे उतरविले. त्यानंतर त्यांनी त्याच ठिकाणाहून दुसरे भाडे घेतले आणि या महिला प्रवाशाला तिच्या इच्छित स्थळी उतरविले. महल प्रवाशी रिक्षामधून उतरत असताना रिक्षाच्या मागच्या सीटवर एक बॅग दिसली. रिक्षामधून खाली उतरलेल्या महिलेला त्यांनी ही बॅग तुमची आहे का? असे विचारले असता ही बॅग तिची



नसल्याचे तिनेसांगितले. त्यामुळे आधी रिक्षामध्ये बसलेल्या प्रवाशाचीच ही बॅग असावी असा आपटे यां संशय आला. त्यांनी बॅगची तपासणी केली असता त्यात दोन लाखांपर्यंतची रक्कम आणि काही महत्त्वाचे कागदपत्रे असल्याचे दिसून आले. बॅगेची आणखी तपासणी केली असता त्यांना एक पावती बुक मिळाले. ज्यावर राजस्थानचा पत्ता आणि एक संपर्क क्रमांक होता. त्या पत्त्यावर त्यांनी संपर्क साधला. परंतु त्या ठिकाणाहून त्यांना योग्य प्रतिसाद मिळाला नाही. यामुळे त्यांनी त्यांच्या राजू नामक मित्राला र बोलावून घेतले. त्याने बॅगेची अधिक तपासणी केली असता बॅगेत एक चेक बुक मिळाले. या चेक बुकमध्ये एक मोबाईल क्रमांक लिहिला होता. त्या क्रमांकावर संपर्क साधला असता समोरच्या व्यक्तीने त्याचे नाव हे प्रेमराम असे असल्याचे सांगितले. प्रेमराज हेच राजस्थान होऊन मुलुंडमध्ये कामानिमित्त आले होते. त्यांनाच आपटे यांनी रिक्षामधून मुलुंड पूर्वे कडे सोडले होते. हे समजल्यावर आपटे यांनी प्रेमराज यांना ज्या ठिकाणी सोडले होते तेथे बोलावले आणि त्यांची पैशांनी आणि कागदपत्रांनी भरलेली बॅग त्यांना परत केली.

दरम्यान बॅग हरवल्याबाबत प्रेमराज यांनी अद्याप पोलिसांकडे तक्रार केली नव्हती. परंतु तरीदेखील कुणाचीही वाट न पाहता रिक्षाचालक आपटे यांनी प्रेमराज यांचा शोध घेऊन त्यांची बॅग त्यांना परत केली. राजस्थानहून मुलुंडमध्ये आलेल्या एका नागरिकाला मुलुंडमधील रिक्षा चालकाचा प्रामाणिकपणा दिसून आला. त्यांनी या प्रामाणिक रिक्षा चालकाचे आभार मानले. तर मुलुंडमध्ये सध्या सतीश आपटे नामक रिक्षा चालकाच्या प्रामाणिकपणाची चर्चा ऐकायला मिळत आहे.

---

# एक फ्लॅट दोघांना विकला

## बिल्डरची चालुगिरी उघडकीस आली

■ **होम टाइम्स टीम**

नाहूर मधील एका बिल्डरने एका फ्लॅटचा दोघांसोबत विक्री व्यवहार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. फसवणूक झालेल्या कुटुंबीयांनी मुलुंड पोलीस ठाण्यामध्ये फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून अधिक पोलिसांकडून तपास केला जात आहे.

मुलुंडमध्ये राहणाऱ्या सीमा पवार आणि त्यांच्या कुटुंबीयांनी अशोक नगर नाहूर येथील मेसर्स ओम बिल्डर्स अँड डेव्हलपर्सच्या एका प्रस्तावित इमारतीमध्ये फ्लॅट घ्यायचे ठरवले होते. त्यासाठी त्यांनी बिल्डर्सच्या कार्यालयात जाऊन फ्लॅट संदर्भात आणि या फ्लॅटचा ताबा कधीपर्यंत मिळेल याची माहिती घेतली होती. त्यानंतर त्यांनी २०१६साली या संदर्भात व्यवहार केला होता. दोन वर्षांमध्ये इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन फ्लॅटचा ताबा मिळेल अशी माहिती पवार कुटुंबीयांना देण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी या फ्लॅटच्या व्यवहारा संदर्भातील बुकिंग रक्कम देखील दिली होती. त्यानंतर त्यांना फ्लॅटचे ताबा पत्र देखील मिळाले होते. परंतु २०२३ मध्ये त्या जेव्हा फ्लॅटच्या ताब्या संदर्भात माहिती घेण्यासाठी बिल्डरच्या कार्यालयात पोहोचल्या त्यावेळी त्यांना हा फ्लॅट आधीच दुसऱ्या ग्राहकाला विकला असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे फ्लॅटसाठी आतापर्यंत बिल्डरला दिलेले पैसे पुन्हा मिळावेत यासाठीचा त्यांनी पाठपुरावा सुरू केला. परंतु पाठपुरावा करून देखील बिल्डरकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे पवार कुटुंबीयांनी मुलुंड पोलीस ठाण्यात बिल्डरच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यासाठी पत्रव्यवहार सुरू केला. अखेर म ेसर्स ओम बिल्डर्स अँड डेव्हलपर्सचे मिलिंद यादव आणि सचिन यादव या दोघांच्या विरोधात मुलुंड पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. पवार कुटुंबीयांचे ८६ लाख ५२ हजार ६०० रुपये या प्रकरणामध्ये अडकले आहेत. त्यासाठी पवार कुटुंबीयांचा पाठपुरावा सुरू होता. परंतु सकारात्मक प्रतिसाद न झाल्यामुळे या डेव्हलपरच्या विरोधात अखेर पवार कुटुंबीयाला पोलिसांचा दरवाजा ठोठावा लागला. दाखल झालेल्या गुन्ह्यानुसार पोलिसांचा तपास सुरू आहे.

Volume : IX | Issue : 25 होम टाइम्स

# तासाभरात दोघांना गंडा घालणाऱ्यांना दोघा भामट्यांना नवघर पोलिसांनी केली अटक

■ **होम टाइम्स टीम**

मुलुंडमध्ये मबोल बच्चनफ करून वृद्ध, महिलांच्या फसवणूक केल्याच्या घटना आजही समोर येत आहेत. सोमवारीही अशीच आणखी एक घटना घडली. पण या भामट्यांनी मुलुंड पूर्व आणि पश्चिम अशा दोन ठिकाणी एका तासाभरात असे दोन गुन्हे केले. नवघर पोलिसांनी धारावीतून या गुन्ह्यातील आरोपींना मोठ्या शिताफीने बेड्या ठोकल्या आहेत.



मुलुंड पूर्व आणि पश्चिम भागात सतत बोल बच्चन करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीबाबत अनेक तक्रारी वाढल्या होत्या. त्यांना गजाआड करण्यासाठी पोलिसांनी विशेष काळजी घेतली होती. संवेदनशील भागात गस्त वाढवून रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या संशयितांवर नजर ठेवली होती. अशा प्रकारचा तपास सुरु असतानाच काही दिवसांतच तांत्रिक तपासाच्या आधारे नवघर पोलिसांनी धारावी येथून दोनजणांना अटक केली. आकाश लुहेरा आणि सुदेश महादेव अशी या दोघांची नावे आहेत. या दोन आरोपींवर अशाच प्रकारे इतर अनेक नागरिकांची फसवणूक केल्याचा संशय आहे. सध्या पोलिसांनीही हे प्रकरण गांभीर्याने घेतले असून या प्रकरणाचा अधिक तपास करण्यात येत आहे.

मुलुंड पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ६४ वर्षीय शशी नायर हे मुलुंड पश्चिम येथील रहिवासी आहेत. ११ सप्टेंबर रोजी ते वैयक्तिक कामासाठी मुलुंड पश्चिम एमजी रोडने जात होते. दरम्यान, एका अज्ञात व्यक्तीनेत्यांच्यासमोर येऊन आपली खोटी ओळखसांगून बोलबच्चन करून त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी काढून ती त्यांच्याच बॅगेत ठेवण्याचा बहाणा केला, मात्र प्रत्येक्षात हातसफाई करून ती स्वतःकडे घेतली आणि काही सेकंदातच घटनास्थळावरून पळ काढला.

काही वेळाने शशी यांनी बॅग उघडून पाहिली असता झडती घेतली असता बॅगेत सोन्याची चेन नसल्याचे लक्षात आले. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर त्यांनी थेट मुलुंड पोलीस ठाणे गाठून पोलिसांना घटनेची माहिती दिली. त्यांची दोन तोळे सोनसाखळी अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. ज्याची एकूण किंमत ६० हजार रुपये आहे.

दुसरीकडे नवघर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार बाळ सुब्रमण्यम कृष्णन हे मुलुंड पूर्व साने गुरुजी नगर येथील रहिवासी आहेत. ११ सप्टेंबर रोजी दुपारी २.०० वाजता ते चप्पल दुरुस्त करण्यासाठी स्टेशनकडे जात होते. ते प्रशांत हॉटेलजवळ पोहोचताच एक अज्ञात व्यक्ती त्यांच्या समोर आला आणि त्याने तो कृष्णन यांचा जुना मित्र असल्याचे सांगून त्याला मिठी मारण्यास सुरुवात केली. मात्र, कृष्णन यांनी त्याला तसे करण्यास मनाई केली आणि तेथून जाण्यास सांगितले. त्यानंतर तो अज्ञात इसम चिंतामणी गार्डनच्या दिशेने निघून गेला. मात्र तो काही अंतर गेल्यावरकृष्णन यांना त्यांनी स्वतःच्या गळ्यात घातलेली १४ ग्रॅम सोन्याची चेन गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. यानंतर त्यांनी थेट नवघर पोलीस ठाण्यात जाऊन घटनेची माहिती दिली. १४ ग्रॅम सोन्याच्या चेनची किंमत ४५ हजार रुपये असल्याचे कृष्णन यांनी पोलिसांना सांगितले.

# मजुराच्या अंगावर पडले उकळते डांबर

## गंभीर अवस्थेत केले सायन रुग्णालयात दाखल

■ **होम टाइम्स टीम**

मुलुंड पूर्व येथील एका इमारतीत मजूर म्हणून काम करणाऱ्या तरुणावर डांबर पडल्याने त्यात तो ६० टक्के भाजल्याची घटना घडली आहे. उपचारासाठी त्याला सायं रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी नवघर पोलिसांनी ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

नवघर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, २२ वर्षीय सिराज शेख हा ११ सप्टेंबर रोजी मुलुंड पूर्वेकडील पाम एकर्स सोसायटीत मजूर म्हणून काम करत होता.

या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर वॉटर प्युरिफायरचे काम सुरू होते. सिराज येथून जात असताना पहिल्या मजल्यावरून सिराजच्या अंगावर गरम डांबर पडले. त्यात तो जबर जखमी झाली. गस्तीवर असलेल्या पोलिसांना याची माहिती मिळाल्याने त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन सिराजला उपचारासाठी वीर सावरकर रुग्णालयात दाखल केले. त्याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला तेथून सायन रुग्णालयात हलवण्यात आले. सध्या नवघर पोलिसांनी साइट पर्यवेक्षक व कंत्राटदार योगेश कदम, शांतीसागर चव्हाण, दीपक कुमार यांच्याविरुद्ध भादंवि कलम २८८, ३३८ आणि ३४ अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# चोराने ६० हजाराच्या मोबाईलची केली चोरी

■ **होम टाइम्स टीम**

काही दिवसांपूर्वी मुलुंड पोलिसांनी चोरी झालेल्या, हरवलेल्या मोबाईलचा तपास करून त्यांची रिकव्हरी करत ते नागरिकांना परत केले होते. त्यावेळी पोलिसांकडून नागरीकांना मोबाईल चोरांवर अंकुश बसविण्यासाठी कोणती काळजी घ्यावी याची माहिती दिली होती. परंतु याच आठवड्यात मुलुंडमध्ये पुन्हा एकदा मोबाईल चोर सक्रिय झाल्याचे दिसून आले आहे.

मुलुंडच्या निर्मल लाईफ स्टाईल परिसरात एका इसमाच्या खिशातून ६० हजाराचा मोबाईल चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. राजेश ढिकले हे निर्मल लाईफस्टाईल परिसरात एका आस्थापनेमध्ये कायदेशीर सल्लागार आहेत. ते त्यांचे काम आटोपून सोमवारी संध्याकाळी ४:००च्या सुमारास घरी परतण्यासाठी मुलुंड स्टेशनला जाणारी ४९६ क्रमांकाची बस पकडत होते. त्यावेळी अचानक त्यांच्या खिशातून सॅमसंग नोट ट्वेंटी हा मोबाईल चोरी केला. राजेंद्र यांना हे समजतात त्यांनी त्यांच्या मित्राला या क्रमांकावर कॉल करायला सांगितला. परंतु त्यांचा फोन स्वीच ऑफ होता. या संदर्भात त्यांनी मुलुंड पोलीस ठाण्यामध्ये मोबाईल चोरीची तक्रार दाखल केली आहे. पोलिसांकडून मोबाईल चोराचा शोध घेतला जात आहे.

CALL CENTER
022 66211333

E-MAIL ID
customerservice@homenet.net

FACEBOOK MESSENGER
HomeNet / @homenet.net

**Facebook Messenger Scan Code:**
To get in touch, simply scan
a code using the Messenger app.

HOME NET
www.homenet.net

WOW!
DOUBLE MAZZA!!
uploads & downloads
at same speed, since 2010
now @ ₹194/-*
Pay for 6 Months & Get Additional 7 Months Free
67 OFFER

## TRULY UNLIMITED SPEED PLANS

| PLAN NAME | 30 DAYS RATE | | 390 DAYS |
|---|---|---|---|
| 20 Mbps Unlimited | 500/- | NOW 231/-* | 3000/- |
| 30 Mbps Unlimited | 600/- | NOW 276/-* | 3600/- |
| 40 Mbps Unlimited | 720/- | NOW 332/-* | 4320/- |
| 50 Mbps Unlimited | 850/- | NOW 392/-* | 5100/- |
| 60 Mbps Unlimited | 985/- | NOW 455/-* | 5910/- |

## UNLIMITED POWER PLANS

| PLAN NAME | DATA(GB) | SPEED AFTER DC | 30 DAYS RATE | | 390 DAYS |
|---|---|---|---|---|---|
| 40 Mbps till Allotted Data | 250 | 20 Mbps | 600/- | NOW 277/-* | 3600/- |
| 60 Mbps till Allotted Data | 500 | 30 Mbps | 750/- | NOW 346/-* | 4500/- |

UPLOAD OR DOWNLOAD @SAME SPEED
99% UPTIME
- Affordable Rates
- Super speed Upto 100 mbps
- Customer support Android / IOS app
- Online Payments
- Customer care 9 am - 12 midnight

67 PE OFFER

## NEWLY LAUNCHED - FIBER TO THE HOME TECHNOLOGY

HOME FIBER
powered by HomeNet

UNLOCK YOUR SUPERPOWER

## INTRODUCTORY HOME FIBER PACKS

UPGRADE YOUR EXISTING HOME NET TO
NEW FIBERNET EXPERIENCE WITH
ZERO INSTALLATION COST**
For New Customers installation charges of Rs.500/-* applicable

## HOME FIBER TRULY UNLIMITED SPEED PACKS

| PACK NAME | DATA(GB) | SPEED AFTER DC | EFFECTIVE MONTHLY RATE | 360 DAYS |
|---|---|---|---|---|
| 35 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 337/-* | 4040/- |
| 50 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 421/-* | 5050/- |
| 75 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 505/-* | 6060/- |
| 100 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 589/-* | 7070/- |

Many more Speed Pack options available up to 500 Mbps

** offer available only at the FTTH G / EPON Ready Building

TO AVAIL THIS
INTRODUCTORY OFFER
IN YOUR SOCIETY
PLEASE COME TO US WITH
A MINIMUM GROUP OF
15 CONNECTIONS

SYMMETRIC SPEED
SUPER SPEED PACK UP TO 500MBPS
EASY LOCAL APPROACH FOR ISSUE RESOLUTION
FASTER VISITS FOR TECHNICAL SOLUTIONS
NO VISIT CHARGES FOR ISSUES & COMPLAINTS

Customer Portal **login.homenet.net**
Customer Service Mobile App **Log2Space - HomeNet**
Download on the App Store
GET IT ON Google Play

FOR NEW CONNECTIONS OR QUERIES CALL
**Call - 75067 96562, 88790 00724, 88790 00720, 88794 47839**
**MULUND** - A / 16, Gaurav Annex, R.R.T Road, Mulund (W), Mumbai - 400 080. Tel.: 022 662 11 333

MALAD • COLABA • VASHI • NERUL • THANE • AIROLI • ASANGAON • VASIND

*conditions apply

Printer , Publisher & Owner : **Hemanshu Girish Kothari** & Printed at Dangat Media Pvt. Ltd, Plot No.22, Digha MIDC, Vishnu Nagar, TTC Industrial Area, Digha, Navi Mumbai. Published at G/4, Landmark Appartment, Devidayal Cross Road, Mulund (W), Mumbai - 80.**Home Times** (Office): - 6th Floor, Flora Point, S.N. Road, Near Mulund Court, Mulund (W), Mumbai-80. **Editor : Hemanshu Girish Kothari** ● **RNI No.: MAHMAR/2016/66872**